Gmail

Rajik Shaikh Executive editor <rajikshaikh2244@gmail.com>

# माहूर व किनवट तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याकडून शेतकऱ्यांना शेती कर्ज देण्यास टाळाटाळ, CIBIL Score व Written Off चे कारण देऊन कर्ज नाकारणे तसेच खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी मागणी करूनही रब्बी हंगामाच्या हिशोबाने कर्ज वाटप सुरू असल्याबाबत.

1 message

**Rajik Shaikh Executive editor** <rajikshaikh2244@gmail.com> Thu, Oct 22, 2026 at 10:12 AM
To: cm@maharashtra.gov.in

**प्रति,**
**मा. श्री. देवेंद्र फडणवीस साहेब,**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,**
**मंत्रालय, मुंबई.**

**विषय :** माहूर व किनवट तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याकडून शेतकऱ्यांना शेती कर्ज देण्यास टाळाटाळ, CIBIL Score व Written Off चे कारण देऊन कर्ज नाकारणे तसेच खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी मागणी करूनही रब्बी हंगामाच्या हिशोबाने कर्ज वाटप सुरू असल्याबाबत.

**महोदय,**

माहूर व किनवट तालुक्यात यावर्षी अत्यल्प पर्जन्यमानामुळे गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी शेती कर्जाची मागणी करूनही महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याकडून कर्ज वाटप करण्यास टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी आहेत.विशेष म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) कडून पात्र शेतकऱ्यांना शेती कर्ज उपलब्ध करून दिले जात असताना महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून कर्ज देण्यास टाळाटाळ होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.तसेच, काही शेतकऱ्यांना CIBIL Score कमी असल्याचे, पूर्वीचे कर्ज Written Off असल्याचे किंवा जुन्या कर्जाच्या नोंदी असल्याचे कारण देऊन शेती कर्ज नाकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत.खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी कर्जाची मागणी करूनही आता रब्बी हंगामाच्या हिशोबाने कर्ज वाटप सुरू असल्याने शेतकऱ्यांना वेळेत कर्जाचा लाभ मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही बाब गंभीर आहे.

**त्यामुळे शासनाने पुढीलप्रमाणे तातडीने कार्यवाही करावी** :

१) महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार येथील शेती कर्ज वाटप प्रक्रियेची चौकशी करण्यात यावी.
२) खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी कर्जाची मागणी केलेल्या पात्र शेतकऱ्यांचे अर्ज तातडीने निकाली काढून नियमानुसार कर्ज उपलब्ध करून द्यावे.
३) दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पात्र शेतकऱ्यांना केवळ CIBIL Score किंवा जुन्या कर्जाच्या Written Off नोंदींच्या आधारे सरसकट शेती कर्ज नाकारले जाऊ नये, याबाबत संबंधित बँकेला आवश्यक निर्देश द्यावेत.
४) माहूर व किनवट तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेती कर्ज मिळण्यासाठी विशेष कर्ज शिबिरांचे आयोजन करून प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करावा.

सदर प्रकरणाची मुख्यमंत्री स्तरावर तातडीने दखल घेऊन महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याबाबत चौकशीचे आदेश देऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, ही नम्र विनंती.

**आपला विश्वासू,**

हेमंत उत्तमराव गावंडे पाटील
रा. सायफळ, ता. माहूर, जि. नांदेड.
मो.८४५९८५६२७०.

---

**New Doc 10-22-2026 10.09.pdf**
339K